# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेसनोट क्रमांक ३०५/२०२४ | दिनांक- १६/०८/२०२४.

## “Momai Global School, Mira Road East.
## येथे सायबर जनजागृती कार्यक्रम”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी सायबर गुन्हे/तक्रारीचे अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आदेशित केलेले होते.

पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतून दिनांक १६/०८/२०२४ Momai Global School, Miraroad East येथे **Cyber Awareness Programm** आयोजन करण्यात आले होते. सदर वेळी पोलीस उप निरीक्षक श्री. प्रसाद शेनोळकर (सायबर पोलीस ठाणे) यांनी १० ते ६५ वयोगटातील मुले, शिक्षक व शिक्षकेतर वृंद यांना सायबर जनजागृतीबाबत खालील विषयांवर सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले.

१) सध्यस्थितीत घडणारे वेगवेगळे सायबर गुन्हे (Trending Cyber Crimes).
२) सोशल मिडीयासंदर्भात घडणारे गुन्हे (Social Media Related crimes/social media etiquette).
३) ऑनलाईन सायबर गुन्हयांस कश्याप्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती (Precautions to be Taken).
४) ऑनलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व व कश्याप्रकारे तक्रार नोंदविता येईल याबाबतची माहिती. (Where and How to Complaint?)

यावेळी १० ते १७ वयोगटातील मुले, शिक्षक असे एकुण १५० श्रोते उपस्थित होते. तसेच सायबर गुन्हे जनजागृतीबाबत पत्रक वाटप करण्यात आली.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.






**--------------0000-------------**